# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३१.०५.२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०२) इतिवृत्त

मंगळवार दिनांक ३१ मे २००५ रोजे स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.काशिनाथ कोकाटे यांचे अध्यक्षतेखाली " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) श्री. खान मुजीब मिर आलम खान
(०३) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०४) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०५) श्री. जगीरदार अजेजमुख्तार अहमद
(०६) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०७) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०८) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०९) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(१०) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(११) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१२) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१३) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१४) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

<u>संवाद :</u>

मा. सभापती : कालच नवीन आयुक्त म्हणून श्री.गुप्ता साहेब यांनी पदभार स्विकारलेला आहे. निवडणूकीनंतरची ही आजची पहिलीच बैठक असल्यामुळे सर्वांचे स्वागत करून मा.आयुक्तांना त्यांचे कामकाजसाठी शुभेच्छा देतो. सर्व सदस्यांनी सभेच्या कामकाजत भाग घ्यावा. विषय क्र.२ मध्ये १२/५/२००५ असे टंकलिखित झालेले आहे. त्याऐवजे १७/५/२००५ अशी दुरूस्ती वाचावी. खेळीमेळीच्या वातावरणात हे कामकाजचालावे अशी अपेक्षा आहे.

श्री.कंवरसिंग बैनाडे : आजची ही पहिलीच बैठक होत असून नवीन आयुक्त श्री.गुप्ता साहेब यांचे भारतीय जनता पक्षाच्या वतीने स्वागत करतो. त्यांचे पुढील कामास शुभेच्छा देतो. पाण्याच्या प्रश्नावर सर्वसाधारण सभेत गंभीर चर्चा झालेली होती. प्रशासनाने या बाबतीत काय पावले उचलली आहेत. तसेच एन-५ पाण्याचे टाकीवरून किती टँकर भरून जतात, कोणत्या भागात पाणी दिले जते, टँकरची संख्या किती, किती किलोमीटर अंतरापर्यंत टँकर जतात, त्याचा दर काय आकारण्यात येतो या सर्व बाबींचा खुलासा करावा.

श्री. गजनन बारवाल : पहिलीच बैठक असल्याने सर्वांना शुभेच्छा देतो. तसेच नवीन आयुक्त म्हणून आलेले श्री.गुप्ता साहेब यांनी पदभार स्विकारला त्यांचे स्वागत करतो. आजची बैठक ही महत्वपूर्ण बैठक आहे. यात आजपर्यंत झालेल्या घडामोडी, प्रशासनाने

केलेले काम, मागील झालेल्या निर्णयांची अंमलबजवणी यावर सविस्तर अशी चर्चा करणे आवश्यक वाटते. गेल्या सर्वसाधारण सभेत पाणी प्रश्नावर अत्यंत पोटतिडकीने चर्चा झालेली होती. प्रशासनाने गंभीर दखल घेतली असावी अशी खात्री आहे. काय दखल घेतली याबाबत खुलासा घ्यावा. मा.खासदार यांनी सुध्दा पाण्याच्या टाकीवर जऊन भेट दिली. पाण्याचे टँकर वेळेवर पोहचत नाही. योग्य ठिकाणी जत नाही. पाण्याचा प्रश्न गंभीर असून पाण्याचा अत्यंत तुटवडा आहे. पाण्याचे नियोजन योग्य प्रकारे व्हावे. मनपाकडे पैसा आहे का? वसूली किती प्रमाणातझालेली आहे. तसेच स्पील ओव्हरची कामे किती झालेली आहेत. ड्रेनेज लाईनच्या, नाल्याची साफसफाईचे टेंडर काढण्यात आले. परंतु नाल्यांची साफसफाई अत्यंत मंदगतीने होत आहे. याची सुध्दा प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे का? जस्त वेळ चर्च करण्याची संधी द्यावी व सर्व प्रश्नांची उत्तरे मिळावी अशी विनंती आहे.

श्री.अजिजज्हागिरदार : सुतगिरणी ते शहानुरमियाँ दर्गा या रस्त्यावर ७८ लक्ष रूपये खर्च केले होते. याबाबत चौकशी चालू होती त्याचे काय झाले. दोन महिन्यात तो रस्ता उखडून पडलेला आहे. तसेच डॉ.दिनकर देशपांडे यांचे भ्रष्ट कारभाराविषयी सुध्दा चौकशी या समितीपुढे आलेली होती. ती चौकशी सुध्दा झालेली असून त्यांचेवर आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आलेली आहे, याबद्दल माहिती देण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य : पावसाळ्यापुर्वीची कामे मनपाने सुरू केलेली आहेत का? नाला साफसफाईचे टेंडर काढले असे ऐकण्यात आले. परंतु काम सुरू झाल्याचे निदर्शनास आले नाही. बजेट मंजूर नाही म्हणून पैसा उपलब्ध नाही असे अधिकारी सांगतात. पावसाळ्यापुर्वीची कामे ही पावसाळ्यापुर्वीच करावी लागणार आहेत. बजेट मंजूर होईपर्यंत अर्धा पावसाळा निघून जईल. त्यासाठी याकडे लक्ष द्यावे.

सौ. लता दलाल : कालच नुतन आयुक्त म्हणून श्री.गुप्ता साहेब यांनी पदभार स्विकारला त्यांना प्रथमत: मन:पुर्वक हार्दीक शुभेच्छा. मा.आयुक्त यांचा कार्यकाळ हा मनपाच्या दृष्टीने भरभराटीचा जवो. शहरवासियांच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने सौख्याचा जवो ही शुभेच्छा व्यक्त करते व दोन तीन प्रश्न उपस्थित करू इच्छिते की, आम्ही निवडून येऊन जवळपास एक महिना झालेला आहे. नागरीकांच्या निश्चितपणे नवीन नगरसेवकांकडून मोठ्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. माजे आयुक्तांनी वृत्तपत्रात स्टेटमेंट केले आहे की, नगरसेवक माझ्याकडे कुठल्या विकास कामा संदर्भात आलेले नाही. पत्रही घेऊन आले नाही. प्रथमत: मी याचा निषेध करते. पाण्याचा प्रश्न, नाल्याचा प्रश्न, रस्त्याचा प्रश्न सर्वसाधारण सभेत उपस्थित केला होता. त्यात आयुक्तांनी लक्ष न देता इतर नगन्य बाबतीत जस्त लक्ष दिले. पाण्याचा प्रश्न असेल, नाला सफाईचा असेल अनेक वृत्तपत्रात नाल्याचे फोटो आलेले आहेत. पावसाळ्यात अनेक रस्त्यांवर खड्डेच खड्डे असतात. या कामासाठी नवीन येणाऱ्या बजेटपुर्वी काय तरतुद करता येईल याविषयी चर्चा करणे आवश्यक आहे. स्पील ओव्हरची कामे मंजूर झाली असल्यामुळे करता येत नाही असे सांगण्यात येगते. ती आवश्यक नसतील तर रस्त्यावरील खड्डे व पाण्याचा प्रश्न तसेच नाला सफाईची कामे करावीत. नाल्यातील वरवरची सफाई केली जते. खालच्या बाजूस गाळ तसाच असतो व नाला सफाई झाली असे म्हणतो. पूर्ण नाला

सफाईसाठी कदाचित बजेट नसेल. या संदर्भातही खुलासा व्हावा. प्रामुख्याने दोन-तीन प्रश्नांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ते जनतेच्या जीवनाशी निगडीत आहेत. तसेच साफसफाईकडे लक्ष देणे आवश्यक आहे. नसता येणाऱ्या पावसाळ्यात अनेक लोक रोगराईला बळी पडतील.

श्री.मुजेब खान : नवीन आयुक्तांचे प्रथमत: स्वागत करतो. निवडून होऊन दीड ते दोन महिने होत आहेत. परंतु प्रशासनाची इतकी वाईट अवस्था कधी बघितली नव्हती. कोणत्याही अधिकाऱ्याकडे पत्र देण्यास गेल्यावर सुटीवर गेले, बदली झाली व पुन्हा गेल्यास सुटीवर गेले असे सांगण्यात येते. असे दीड ते दोन महिन्यांपासून चालू आहे. पावसाळा जवळ येत आहे. नाल्याच्या बाबतीत जे टेंडर झाले त्या संदर्भात नाला सफाईची कामे तशीच आहेत. पाऊस आला तर अर्धा नाला साफ होतो व अर्धे पाणी लोकांच्या घरात जते. झोन कार्यालयातही गेल्यास साहेब नाही असे नेहमी सांगण्यात येते. त्यासाठी आज प्रथमत: अधिकाऱ्यांनी कोणत्या वेळात कार्यालयात उपस्थित असावे, दुपारनंतर केव्हा असणार जेणे करून नागरीकांचे विकास कामासाठी चर्चा करता येईल.

श्री. दिलीप गायकवाड: नवीन आयुक्तांचे प्रथमत: स्वागत करतो. या शहरात सन २००३ ते २००५ या काळात ट्रान्सपोर्टच्या किती गाड्या नाक्यावरून आलेल्या आहेत याची माहिती देण्यात यावी.

श्री.शशांक विसपुते : नवीन आयुक्तांचे प्रथमत: स्वागत करतो. गारखेडा भागात ८०% टँकरद्वारे पाणी पुरवठा होतो. तो सुरळीतपणे करण्याची गरज आहे. नागरीकांना एक-एक किलोमीटरवरून पाणी आणावे लागते. या भागात हातपंप द्यावे तसेच या भागात लाईटसाठी सामुग्री कमी पडते. स्ट्रीट लाईटचा मोठा प्रॉब्लेम आहे. यामुळे चोऱ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. आधुनिक यंत्रसामुग्री आणावी.

श्री.विनायक पांडे : नवीन आयुक्त यांचे प्रथमत: स्वागत करतो. नवीन नगरसेवक निवडून आलेले असून त्यांचेकडून नागरीकांच्या मोठ्या अपेक्षा आहेत. माझ्या वार्डात ऐतिहासिक दोन स्थळे आहेत. बीबीचा मकबरा तसेच बौध्दलेणी. या भागातील रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत. अधिकारी सांगतात बजेट मंजूर नाही त्यास वेळ लागेल. अनेक पर्यटक तेथे येतात. त्यांना असे सांगू शकत नाही. हीच अवस्था स्ट्रीट लाईटच्या बाबतीत आहे. अनेक लाईट बंद आहेत. मकबऱ्यासमोरील थ्रीसेट लाईट सुध्दा बंद आहेत. ते चालू करण्यासाठी बजेटची वाट बघायची का? याचा सविस्तर खुलासा करण्यात यावा. हनुमान टेकडी परिसरात टाकीचे काम मंजूर झालेले आहे त्याची कार्यवाही कुठपर्यंत आलेली आहे. ज्या काही गृहनिर्माण संस्था आहेत तेथे सुविधा दिल्या जत नाहीत. ते बेटरमेंट चार्जेस भरणा करतात. गेल्या अनेक दिवसांपासून माझ्या वार्डात अनेक गृहनिर्माण संस्थांच्या रस्त्याची कामे होत नाहीत. त्यांना नागरी सुविधा केव्हा आणि कशा पुरविण्यात येणार आहेत याचाही खुलासा करावा.

सौ. संगिता जधव : पुंडलिकनगर भागात १ ते ११ गल्ल्यापर्यंत पाणी येत होते ते आता फक्त पाच गल्ल्यापर्यंतही येत नाही. हनुमाननगर टाकीमध्ये पाणी येईपर्यंत १ ते ११ गल्ल्यापर्यंत पाणी पुरवठा करण्यात यावा. मा.सभापती आणिक संबंधीत अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी.

सौ. वंदना खंदारे : माझ्या वार्डात पाण्याची व्यवस्था करावी.

श्री.शशांक विसपुते : माझ्या वार्डात मनपाची खुली जगा आहे. तेथे अनधिकृतपणे अतिक्रमण झालेले आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करून काढले नाही. कएदा काढण्यात आले होते. पुन्हा अतिक्रमण झाले. तसेच तेथील संरक्षित भिंतीचे काम अर्धवट राहिलेले आहे. ते का पूर्ण करण्यात आले नाही याचा खुलासा करण्यात यावा.

मा. सभापती : वेगवेगळ्या अशा तक्रारी स.सदस्यांनी केलेल्या आहेत. पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी नोंद घेतली असेलच. त्यात एन-५ पाण्याच्या टाकीवरून किती टँकरने पाणी पुरवठा होतो, तो कोणत्या भागात होतो तसेच काही भागात पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. पुंडलिकनगर भागात गल्ली नं.१ ते ११ या गल्ल्यांमध्ये पाणी येत होते ते का पुरविले जत नाही. या भागातील तीन-चार गल्ल्यातच पाणी येत नाही. पाणी पुरवठा सुरळीत का होत नाही. काही अनधिकृत वस्त्यास टँकरचे पैसे भरणा केले असताना पाणी दिले जत नाही अशी तक्रार आहे. तसेच हनुमान टेकडी येथील टाकीचा प्रश्न उपस्थित झाला. तसेच अनेक भागात पाणी सुरळीत येत नाही. पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी यांनी सविस्तर खुलासा एकाच वेळी करावा.

अधि.अभि./श.अ. : या शहरासाठी साधारणतः ११५ एमएलडी पाणी पुरवठा करतो. लोकसंख्येचा विचार करता हे पाणी थोडे कमीच पडते. प्रत्येक व्यक्तीसाठी १४०/१५० लिटर पाणी दररोज द्यावयास पाहिजे परंतु स्धया ११५ ते १२० लिटर प्रति व्यक्तीस प्रति दिवस पाणी देतो. ज्या काही तक्रारी येतात त्याबद्दल माझे निवेदन असे की, बऱ्याच वेळेस वेळेवर पाणी देऊ शकत नाही. विजेच्या भार नियमनामुळे सर्व वेळेत बदल होतात. दुसरी बाब अशी की, एमएसईबीचे अनेक वेळा कामे निघतात. त्यासाठी जस्त पाणी उचलू शकलो नाही. त्याच दिवशी कॅपॅसिटर सुध्दा जळाले होते. ते दुरूस्त करण्यात जस्त वेळ गेलेला होता. त्यामुळेही जस्त पाणी पुरवठा करू शकलो नाही. तरीसुध्दा ढोरकीन येथे दोन पंपाद्वारे बायपास करून पाणी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. पुंडलिकनगर, गजनननगर मध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करतो. मनपाचे मालकीचे ९ व भाड्याने घेतलेले १० टँकर असे एकूण १९ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जतो. गजननगर, पुंडलिकनगर भागात जेथे पाणी जत नाही तेथेही टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जतो. १० टँकरद्वारे दररोज १२५ खेपा होतात. बऱ्याच वेळेस वेळेवर पाणी न देण्याचे कारण टँकर खराब होणे. पाण्याची सध्या कमतरता आहे. जेवढे पाणी लागेल तेवढहे पाणी देऊ शकत नाही. तरी कोणतीही कसूर न करता जस्तीत जस्त पाणी कसे देता येईल यासाठी प्रयत्न चालू आहेत. जयकवाडी व ढोरकीन येथे नवीन पंपाचे काम केलेले आहे व चालू सुध्दा केले आहेत. साधारणतः दीड महिन्यापासून ५ एम.एल.डी.पाणी जस्त घेतो. तरी सुध्दा ते कमीच पडते. जस्तीत जस्त पाणी घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. १८-२० एमएलडी पाणी वाढविण्यासाठी जी ६७ कोटीची योजना आहे त्यातील ७-८ कोटीची कामे झालेली आहेत. उर्वरीत काही काम राहिलेले असून ते झाल्यानंतर आणखी जस्त प्रमाणात पाणी उचलू शकू. तसेच जे पाणी वाया जत होते त्याचे सुध्दा नियोजन केलेले आहे. फारोळ्यात १ ते १.५ एम.एल.डी. पाणी वाया जत होते ते सध्या घेत आहोत. परंतु बऱ्याच वेळा लोड शेडींग, लाईट गेल्यामुळे तसेच देखभाल दुयस्तीचे जे काम असते त्यामुळे विस्कळीतपणा येतो.

जस्तीत जस्त पाणी घेण्याचे प्रयत्न करीत आहोत. पहाडसिंगपुरा येथील पाण्याच्या टाकीचे टेंडरची कार्यवाही झाली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : जे खुलासा केला त्यामध्ये सदस्य समाधानी असतील असे वाटत नाही. कारण हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. हा विभाग गांभीर्याने लक्ष देत नाही असे वाटते. बऱ्याच ठिकाणी पाणी गळती होते. ज्या भागात कमी दाबाने पाणी येते, गळती कमी केली तर पाणी वाढू शकते. यावर लक्ष केंद्रीत करावे व यासाठी ठोस पावले उचलावीत.

श्री.मुजेब खान : आताच खुलासा केला त्यात नेहमी म्हटले एमएसईबीचा फॉल्ट होतो, लोडशेडींग होते. सर्वसाधारण सभेत मी एक ठराव ठेवलेला होता की, शहरात जेथे टाकीवर पंप हाऊस आहेत त्यासाठी स्पेशल लाईन एमएसईबीने टाकून द्यावी. जेणे करून अधिकाऱ्यांना तसेच शहरातील नागरीकांना त्रास होणार नाही. सभागृहात सूचक नसल्यामुळे प्रस्ताव राहून गेला. हर्सूल पंपावरून जे पाणी जते सिडको, हडको, रविंद्रनगर, नेहरूनगर, मुजेब कॉलनी, युनूस कॉलनी या भागात पाणी येते. परंतु सध्या चार-पाच दिवसाआड पाणी येते. पाणी सोडणारे कर्मचारी १ तासाचा वेळ देतात. ५ मिनिटे पाणी ठेवतात एक हंडा पाणी मिळत नाही. जे पाणी सोडतात त्यांचेवर नियंत्रण ठेवण्यात यावे. मी स्वत: मकसूद कॉलनी जवळ उभे राहून बघितले ५ मिनिटांसाठी नळ सोडला व बंद केले. त्यानंतर लोक जमा झाले. त्यांचेशी मी चर्चा केली. पुन्हा १० मिनिटांसाठी पाणी सोडले.

सौ. लता दलाल : खुलासा झाला त्यात काही त्रुटी आहेत. शहरातील ज्या जुन्या पाईपलाईन व व्हॉल्व्ह आहेत तो प्रत्येक वॉल लिकेज होत आहे. कोटला कॉलनी भागात वॉल लिकेज असल्यामुळे काम चालू आहे. जेव्हा विजेचे भारनियमन असते तेव्हा काम करावे. पाणी पुरवठ्यात व्यत्यय येणार नाही. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे पाण्याची जस्त आवश्यकता असते. जयकवाडीमध्ये सुध्दा भरपूर पाणी साठा आहे. फारोळा येथे जलशुध्दीकरणाची जी यंत्रणा आहे, टाक्या आहेत त्याकडे लक्ष द्यावे. त्याचा परिणा पाणी पुरवठ्यावर होतो. अनेक भागात टाक्यांची आवश्यकता आहे. एक्स्प्रेस लाईन असे म्हटले जते परंतु ती एक्स्प्रेस आहे की पॅरलल आहे कळत नाही. एक्स्प्रेस लाईनचा शहर व सिडकोला कितपत उपयोग झालेला आहे. एक्स्प्रेस लाईनमुळे ७०० व १४०० दोन्ही लाईनमध्ये अडचण येते. पुर्वी या दोन्हीपैकी एक लाईन बंद असली तरी दुसऱ्या एका लाईनद्वारे पाणी पुरवठा होत असे. परंतु असे उत्तर ऐकायला मिळते की, एक्स्प्रेस लाईन ही सिडकोसाठी आहे. शहरासाठी नाही. तर एक्स्प्रेस लाईन कशासाठी टाकलेली आहे. यासाठी टाकलेली होती की शहर व सिडकोला दोन ठिकाणाहून पाणी पुरवठा व्हावा व ७०० मीमीच्या पाईपलाईनमधून जे भाग पाण्यापासून वंचित राहिल त्या भागात पाणी पुरवावे. परंतु एक्स्प्रेस लाईन येऊनही १४०० व ७०० च्या लाईनवर अडचण येते असे दाखविले जते. तर एक्स्प्रेस लाईनचा उपयोग काय? एकाच टाकीतून दोन पाईप टाकले अशी परिस्थिती त्या एक्स्प्रेस लाईनची असेल तर ती एक्स्प्रेस लाईन की पॅरलल आहे याचा खुलासा करावा व जस्तीचा खर्च केलेला आहे हा गैरसमज दूर करावा. पाणी पुरवठ्यात चांगल्या प्रकारे सुधारणा कशी करता येईल. एक्स्प्रेस लाईन टाकायची असेल तर तशी माहिती द्यावी व त्यादृष्टीने प्रयत्न करता येतील. पाणी पुरवठ्यात सुरळीतपणा येऊन संपूर्ण शहराला पाणी

पुरवठा होईल व पाणी असूनही काही तांत्रिक कारणांमुळे पाणी पुरवठा होत नाही. तो व्यवस्थित होण्याच्या दृष्टीने तसा खुलासा या सभागृहात करावा.

श्री.गजनन बारवाल : स.सदस्यांनी जे प्रश्न मांडले त्याची प्रशासनाने गंभीर अशी दखल घेतलेली दिसून येत नाही. उपाययोजना काय केलेली आहे? जी माहिती दिली एक्स्प्रेस लाईन अशी आहे. भारनियमन होते. याबद्दल माहिती दिलेली आहे. शहरासाठी पाणी पुरवठा व्यवस्थीत होण्यासाठी काय उपाययोजना केली यासंबंधी माहिती अपेक्षित आहे. हातपंप घेण्यात आले का? टँकर वाढविण्यात आले का? पाण्याचे नियोजन योग्य प्रकारे होते का? ज्या टाक्या बांधून आहेत त्यांचेत पाणी साठवण करतो का? काही गल्ल्यामध्ये पाण्याचे टँकरच देत नाही ते वाढविण्यात आले का? जे प्रश्न उपस्थित केले त्यांचे उत्तर मिळालेले नाही. फक्त पाण्याची रचना कशी आहे याचीच माहिती दिली. प्रशासन कोणतेच प्रयत्न करीत नाही असे दिसून येते. शहरात जे पाणी मिळते ते दूषित पाणी मिळते. काही ठिकाणी अल्प प्रमाणात तर काही ठिकाणी पाणीच मिळत नाही. मी नेहमी प्रश्न विचारतो त्यांचे बरोबर व्हिजेटला जतो. परंतु गेल्या १५ दिवसात असे दिसून आले की, पाण्याचे टँकर वाढविण्यात आले नाही. हातपंप केले नाही किंवा दुरूस्त करण्यात आले नाही किंवा पाणी पुरवठा होण्यासाठी काही योजना आखण्यात आल्या किंवा पाणी पुरवठा सुरळीत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले नाही. वेदांतनगर भागात पाण्याची टाकी आहे. टाकी असून तेथे टाकीच्या पातळीबरोबर पाणी येत नाही. कारण इतर ठिकाणी पाणी पुरविले जते तर टाक्या बांधायच्या कशासाठी. जी एक्स्प्रेस जलवाहिनी आहे ती एक्स्प्रेस नाहीच असे माझे मत आहे. पाण्याचा प्रश्न सोडवायचा असेल तर एक कमिटी तयार करून चर्चा करून गंभीर दखल घेण्यात यावी. तसेच अनेक ठिकाणी वॉल लिकेजआहे तसेच अनधिकृतपणे घेतलेले नळ कोणी पाणी भरत नसताना ते तसेच वाहतात त्याची गंभीर दखल कोणी घेत नाही. ६७ कोटीची योजना आहे त्यातील ८ कोटीचे काम प्रगतीपथावर आहे. खरोखरच हे काम चालू आहे का, याबाबत नुतन आयुक्तांनी दखल घ्यावी. तसेच गारखेडा, पुंडलिकनगर व इतर काही भागात पाणी येत नसेल तर टँकरची व्यवस्था करण्यात यावी.

श्री.दिलीप गायकवाड : हर्सूल तलावात झालेले अतिक्रमण काढून तलावातील गाळ काढून जलशयाची क्षमता वाढविल्यास शहराला चांगल्या प्रकारे पाणी पुरवठा होऊ शकेल.

श्री.अजिजजहागिरदार : बनेवाडी भागात १५ वर्षापुर्वी पाण्याची टाकी बांधलेली आहे. अद्यापही टाकीतून पाणी सोडण्यात आलेले नाही. खुलासा घ्यावा.

श्री. मुजेब खान : स.सदस्यांनी वॉल लिकेजेसवर सविस्तर चर्चा केली. खुलासा करण्यात आला. गेल्या सर्वसाधारण सभेत मी नव्हतो. परंतु वृत्तपत्रात आले पाणी व कचऱ्याचे बाबतीत खूप चर्चा झाली. सर्व परिस्थिती सदस्यांनी समोर आणली. परंतु सभा झाल्यानंतर आतापर्यंत काहीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. अशी माझी माहिती आहे. या सभागृहात चर्चा करणार पुढील बैठकीत हीच चर्चा करणार असाल तर उपयोग नाही. बैठकीत चर्चा झाल्यानंतर दुसऱ्या बैठकीत त्यावर काय कार्यवाही केली याचा खुलासा होणे अपेक्षित आहे. नसता येथे येऊन आपण वेळ वाया घालवू नये. १९८८ च्या बॉडीत चर्चा केली तर काहीतरी कामे होत होती. झोनमध्ये झोन अधिकारी हजर नसतात. कचऱ्याचे ढिगारे लागलेले आहेत. पुन्हा

चर्चा होते की अधिकाऱ्यांच्या विरोधात जतात परंतु विरोधात जण्याचा प्रश्न नाही. चर्चा झाली तर अंमलबजवणी झाली पाहिजे. नुसती चर्चा करून फायदा नाही.

श्री.शशांक विसपुते : शहरात ११५ एमएलडी पाणी येते. १४० एमएलडीची गरजआहे. याचा अर्थ ८० ते ८५% पाणी पुरवठा होतो. आठवड्याचे सात दिवसापैकी ५ दिवस पाणी देऊ शकतो. परंतु आजपरिस्थिती अशी आहे की, एक दिवसाआड सुध्दा भरपूर पाणी येत नाही. याचा अर्थ त्यांचे आकडेवारीत दुरूस्तल करावी. ११५ एमएलडी पाणी मिळते व १४० एमएलडी पाण्याची गरज आहे किंवा ११५ एमएलडी पाणी वितरीत करण्यास प्रशासनाचे नियोजन नाही. गारखेडा भागात नळ ओपन आहेत. तो भाग उताराचा असल्याने सतत पाणी वाहात असते. पाणी भरणा झाल्यानंतरही ते पाणी वाया जते. त्यापुढे दोन कॉलनीजआहेत. तिरूपती आणि साहस सोसायटी. त्यांना पाणी कमी पडत असते. एका वेळी एकाच कॉलनीस पाणी सोडत असत. परंतु दोन्ही सोसायटीला पाणी देताना गारखेडा भागातील पाईपलाईन चालू असते. उपाय म्हणून प्रशासनाने गारखेडा गाव बायपास केले. बायपास करताना थोडेसे काम बाकी आहे म्हणून सांगतात त्यावर निर्णय घ्यावा. जेणे करून वाया जणारे पाण्याच बचत होईल.

श्री.रेणुकादास वैद्य : काही भागात दररोजदोन तीन तास पाणी येते व काही भागात एक दिवसाआड पाणी देऊनही अर्धा तास पाणी येते. यासाी संपूर्ण शहरास समान पाणी द्यावे.

मा. सभापती : पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी रजेवर आहेत. अधिक्षक अभियंता यांनी त्यांचेकडे उपलब्ध माहितीच्या आधारे खुलासा केलेला आहे. योजना कशी चालते याचा अहवाल दिला. त्यावर स.सदस्यांचे समाधान झालेले नाही. चर्चा करून पाणी प्रश्न सुटणार नाही. सूचना करणयात येते की, प्रशासनाला जी काही मदत पाहिजेत्या बाबतीत हे सभागृह सदैव तयार आहे. एक दिवसाआड पाणी देण्याला सर्वांनी संमती दिली. ११५ एमएलडी पाणी येऊन सुध्दा जनतेला पाणी देऊ शकत नसल्यास कुठेतरी नियोजन चुकते आहे. अधिकारी वारंवार रजेवर जण्याचे प्रमाण वाढले आहे. उन्हाळा असल्यामुळे सर्वांकडून जस्तीचे काम घेतले पाहिजे उलट अधिकारी सुटीवर जतात. ज्या काही सूचना स.सदस्यांनी केलेल्या आहेत त्याची दखल घेण्यात यावी. पुंडलिकनगर भागात ११ गल्ल्यांमधये पाणी येत होते ते सुरळीत करावे. तसेच हर्सूल तलावातून कटकटगेट, मकसूद कॉलनी, रविंद्रनगर भागात पाणी पुरवठा सुरळीत करावा. सिडकोच्या सोसायटीमधील पाणी पुरवठा बंद झालेला आहे. जे निष्काळजीपणा आहे. हर्सूल येथील पंपाची मी स्वत: पाहणी केलेली आहे. एक पाईप ८ दिवस बदलू शकलो नाही. त्यानंतर पाईप बदलण्यात आले. पाणी पुरवठ्याच्या बाबतीत कुणी कर्मचारी/अधिकारी यांनी निष्काळजीपणा केल्यास स्थायी समितीच्या माध्यमातून मा.आयुक्तांना टिप्पणी पाठवू. कामात दिरंगाई होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे आठ कोटी रूपये स्थायी समितीने मंजूर केलेले होते त्या कामाच्या निविदा निघालेल्या आहेत. त्वरीत कामे व्हावीत. ज्या टाक्यांचे निविदा झालेल्या असतील त्या कामाची तात्काळ कार्यवाही व्हावी. टाकी बांधून दहा-दहा वर्षे झाली, पाणी देऊ शकलो नाही. पडेगांव भागात एक टाकी बांधलेली आहे तेथेही पाणी पुरवठा होत नाही. अधिक्षक अभियंता यांनी या बाबतीत स्वत: जतीने लक्ष घालून सर्व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन पाण्याचे नियोजन करावे. लिकेजेस बंद करावेत. त्यासाठी बजेटमध्ये

तरतूद करता येईल. काहीतरी सुधारणा झाली हे पुढील सभेपर्यंत स.सदस्यांच्या निदेर्शनास आले पाहिजे

श्री.साहेबराव कावडे : पाणी पुरवठ्याबाबत बोलणार नाही. चर्चा करूनही तो प्रश्न सुटू शकत नाही. पाणी पुरवठा विभागाची काही कामे एक दोन वर्षापासून चालू आहेत. ती कामे संबंधीत ठेकेदार पूर्ण करीत नाही. यासाठी सुध्दा मर्यादा असते. विहित मुदतीत त्या ठेकेदाराने काम केले नाही तर काळ्या यादीत समावेश करावा. लायसन्स रद्द करावे. मा.आयुक्तांनी लक्ष द्यावे. मुदतीत काम का झाले नाही. यापुढे जे काम करीत त्यांनाच काम देण्यात यावे.

श्री.मुजेब खान : शहागंज येथील टाकीवर नेहरूनगरकडून पाईपलाईन टाकण्याचेकाम होते. ९६-९७ मध्ये ते काम चंपा मस्जेद पर्यंत केले. आज रोजे अर्धवट काम तसेच आहे. अशी किती कामे आहेत की जे अर्धवट आहेत. १५० मीमी व्यासाच्या लाईनचे काम अर्धवट आहे ते पूर्ण करावे. जेणे करून त्या भागातील पाणी समस्या सुटेल.

श्री.गजनन बारवाल : पाणी पुरवठ्याची कामे करण्यास कोणताही ठेकेदार इच्छुक नाही. त्यांची बिले त्वरीत दिली जत नाहीत.

श्री.मिलिंद दाभाडे : माझ्या वार्डात ४-५ लोकांचे एक-एक कुटुंब आहे. त्यांन पिण्याइतके पाणी दिले जत नाही. शहरात मोठमोठ्या हॉटेल्स असून हजरो लोक तेथे येतात. तेथे पाणी कसे उपलब्ध असते.

मा. सभापती : चारही कार्यकारी अभियंत्यांना सूचना देण्यात येत आहे की, स.सदस्यांनी ज्या सूचना केल्या त्या अत्यंत मौलीक आहेत. कामाची निकड लक्षात घेऊनच निविदा निघतात. निश्चित केलेल्या वेळेत त्या ठेकेदारांनी काम केले पाहिजे ज्या अडचणी येतात त्या निविदा काढण्यापुर्वी लक्षात आल्या पाहिजे एकदा वर्क ऑर्डर दिल्यानंतर काम करून घेण्याची जबाबदारी संबंधीत कार्यकारी अभियंत्यांची राहील. ज्या कामाची मुदत संपलेली आहे, जे कामे २-३ वर्षापासून चालू आहेत अशा कामांचा अहवाल आगामी स्थायी समिती समोर सादर करावा. स.सदस्यांनी केलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी. कामे सबस्टिट्यूट केले जणार नाही.

श्री. मुजेब खान : पावसाळा जवळ येत आहे. साफसफाई संबंधी चर्चा करणे गरजेचे आहे. झोनमध्ये परिस्थिती बिकट आहे. मा.आयुक्तांनी भेट दिली तर बरे होईल. जे कर्मचारी सफाईचे काम करतात ते इतर कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांच्या जगेवर काम करीत असल्याचे आढळून येते. अर्ध्या पगारामध्ये दुसऱ्यांना कामावर लावतात. रोशनगेट, नेहरूनगर भागात लहान मुले काम करीत असल्याचे चित्र दिसते. मुळ कर्मचारी तेथे नाही. एक म्हातारी बाई साफसफाई करीत होती, हात कापत होते. त्या बाईला चालता येत नव्हते. तरी सुध्दा ती काम करीत होती. नांव विचारले असता मुळ कामगाराचे नांव सांगितले. असे प्रकार बंद करावेत. मुळ कर्मचारी/कामगार जेआहेत त्यांनीच काम करावे.

मा. सभापती : हा प्रश्न विभागीय अधिकाऱ्यांशी संबंधीत आहे. यावर नंतर चर्चा करता येईल. प्रथमत: नाले सफाईच्या बाबतीत खुलासा करण्यात यावा. निविदा काढल्या आहेत, कामे कोणत्या स्तरावर आहेत.

कार्य.अभि.(ड्रे./वि.) : सन २००५-२००६ या वर्षासाठी एकूण २९ कामांची नाले सफाईची निविदा काढलेली आहे. १६ लक्ष रूपये खर्च येणार आहे. पूर्ण गाळ काढण्याकरीता खूप जस्त खर्च येणार आहे. प्रत्येक नाल्यातील जेथे बॉटल नेक वाहत जईल, अडणार नाही एवढीच व्यवस्था होईल. २९ कामांपैकी १८ कामांना सुरूवात झालेली आहे. उर्वरीत एक दोन दिवसात सुरू होतील.

मा. सभापती : २९ कामांची यादी वाचून दाखवावी. काही नाले सुटले असतील तर नमूद करता येतील.

श्री.गजनन बारवाल : अनेक ठिकाणच्या नाल्यावरील जगा काही लोकांना लीजवर दिलेल्या आहेत. त्या ठिकाणच्या नाल्याची सफाई करण्याबाबत संबंधीतास आतापर्यंत काही सूचना देण्यात आलेल्या आहेत का?

सौ.लता दलाल : आताच खुलासा झाला की १६ लक्ष मध्ये फक्त वरचा कचराच काढणार. येत्या पावसाळ्यामध्ये निश्चितपणे पाणी वरच्या लेवलला येऊन पूर्ण त्या भागात जणार नाही का? संपूर्ण घाण, जे गाळ आहे तो पूर्ण काढणार आहे का? काढणार नसाल तर १६ लक्ष कशासाठी खर्च करायचे. संपूर्ण गाळ काढण्यास किती खर्च येईल याचा खुलासा व्हावा. नसता नेमेची येतो पावसाळा. प्रत्येक वर्षी १२, १४, १६ लक्ष खर्च करतो. गाळ तसाच राहून जतो. अशा पध्दतीने ठेकेदार हे बाजूला कचरा लवतात. एक पाऊस पडला की कचरा पुन्हा नाल्यात येतो व पावसाचे पाणी घरात जते. हा कचरा काढल्यानंतर त्या ठेकेदाराला तो उचलून घेऊन जण्याच्या सूचना कराव्यात.

श्री.रेणुकादास वैद्य : टेंडर प्रोसेस झाली. ४०% बिलोने कामे गेली. कचरा बाजूला करण्यात येईल व नाले सफाई झाली असे घोषित करतील. काम व्यवस्थित करणार नाही. व्यवस्थित काम होण्यासाठी लक्ष ठेवावे.

श्री.दिलीप गायकवाड : स्लम भागातील नाल्यामध्ये खूप घाण झालेली असून तेथे घाण काढण्यासाठी मनुष्यबळ कमी पडते आहे. सुरत पॅटर्नमध्ये जेलोक काम करीत होते त्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे. नाल्यातील गाळ , कचरा त्यांचेकडून साफ करून घ्यावे.

कार्य.अभि.(वि./ड्रे.) : नाल्यातील पूर्ण गाळ काढण्यासाठी एका नाल्यास किमान २० ते २५ लक्ष रूपये खर्च येईल असा अंदाजआहे. नाल्यामध्ये गाळ नसून आजूबाजूच्या लोकांनी कचरा टाकलेला आहे. दरवर्षी पाणी वाहत जवे एवढीच साफसफाई करीत असतो. आता नाल्याची यादी वाचून दाखविण्यात येते.

१. दादा कॉलनी ते स्मशान मारोती पर्यंतच्या नाल्याचे काम सुरू झाले आहे.
२. टाऊन हॉल येथील नाला सफाईचे काम सुरू झालेले आहे.
३. टाऊन हॉल ते नुर कॉलनी नाल्याचे काम सुरू आहे.
४. शरीफ कॉलनी ते कटकटगेट पर्यंतच्या नाल्याची सफाई सुरू आहे.
५. रहेमानिया कॉलनी ते मस्जीद पर्यंतचा नाला साफ करणे सुरू आहे.
६. जफरगेट ते दादा कॉलनी
७. यशवंतपुरा येथील अंतर्गत नाल्याची सफाई.

श्री.मुजेब खान : शरीफकॉलनी ते कटकट गेटच्या नाल्याची सफाईचे काम सुरू झालेले नाही. आताच मी त्याच रस्त्याने आलेलो आहे. कुठेही कामगार आढळून आले नाही.

मा. सभापती : शरीफ कॉलनीच्या नाल्याची सफाईचे काम कोणत्या एजन्सीमार्फत सुरू आहे व कोणते अधिकारी हे काम पाहतात त्यांनी खुलासा करावा.

उप अभियंता(ड्रेनेज) : शरीफ कॉलनी ते कटकटगेट पर्यंतच्या नाला सफाईचे काम अहमदी कन्स्ट्रक्शनमार्फत सुरू आहे. आजच सकाही ११ वा. त्यांचे ४ लेबर हे कटकटगेट जवळील जे पुल आहे त्या पुलाखाली कचरा काढण्याचे काम करीत आहेत. आजच काम सुरू झालेले आहे.

मा. सभापती : जेव्हा काम सुरू होईल व संपेल तेव्हा संबंधीत नगरसेवकांना ते काम झाल्याचे दाखविण्यात यावे. याची नोंद घ्यावी.

श्री. मुजेब खान : काम सुरू झालेले नाही. चुकीची माहिती देण्यात येऊ नये. नगरसेवकांना दाखविण्याची आवश्यकता नाही. संबंधीत अधिकारी यांनी पाहणी करावी. टाकळकर सोसायटी लगत ४० ते ४५ लक्ष रूपये खर्च करून गटार बांधण्यात आलेली होती. त्या गटारीत पूर्ण कचरा साचला आहे. लोकांनी तेथे मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केलेले आहे. ते अतिक्रमण काढण्यात आले नाही. लोकांनी माती टाकून अतिक्रमण केले. हॉटेलवाल्यांनी फरशा टाकल्या आहेत. त्या नालीतील फक्त माती काढायची आहे. मकसूद कॉलनी येथील नाला तसाच आहे. बाजूला लोक राहतात त्यांना याचा त्रास होत आहे. दीड महिन्यापासून पत्र देत आहे. एक पाऊस येईल, संपूर्ण साफ होईल. आम्ही केले म्हणून दाखविण्यात येईल.

मा. सभापती : नाल्यांची सफाई होते किंवा काय याची पाहणी अधिक्षक अभियंता यांनी करावी. त्यानंतर उप आयुक्त, मी स्वत: व संबंधीत वार्डाचे नगरसेवक आम्ही पाहणी करू. जेथे कामे सुरू झालेली नसतील ती त्वरीत सुरू करण्यात यावी. स.सदस्य सौ. लता दलाल, श्री.दिलीप गायकवाड तसेच श्री.वैद्य यांनी ज्या सूचना केल्या त्याची दखल घ्यावी. फेरनिविदा करणे कितपत योग्य होईल ते प्रशासनाने तपासून पहावे. ३० ते ४० टक्के कमी दराने कामे जतात ती कामे योग्य प्रकारे व्हावी यासाठी मा.आयुक्तांनी लक्ष द्यावे. संपूर्ण नाल्याचा गाळ काढणे आजरोजी शक्य होणार नाही. त्यासाठी जवळपास ७ ते ८ कोटी रूपये खर्च लागणार आहे. परंतु भविष्यात शहरात ड्रेनेजची व्यवस्था करणार आहोत त्या योजनेत याचा समावेश करून नाला मुक्त शहर करण्यासाठी काय करता येईल त्याचा अहवाल तयार करण्यासाठी मी सूचना दिलेल्या होत्या. ड्रेनेज व्यवस्था सुरळीत झाल्याशिवाय नाले व्यवस्थित होणार नाहीत. ड्रेनेज वाहण्यासाठी की पावसाचे पाणी जण्यासाठी नाले आहेत हेच कळायला मार्ग नाही. ही अवस्था बदलावयाची असेल तर काम व नियोजन करण्याची आवश्यकता आहे. त्याचे नियोजन करण्यात यावे. सध्या नाले सफाईचे काम ज्या एजन्सीने सुरू केलेले नसतील ते सुरू करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

श्री. गजनन बारवाल : शहरातील मोठ्या नाल्यावर दुकान, घर, बँकेसाठी लिजवर परवानगी देण्यात आलेली होती. उदा.श्रीमान-श्रीमती दुकानचा नाला, सुराणा कॉम्प्लेक्स, औषधी भवन या लोकांनी त्यांना ज्या अटी व शर्ती घालून दिल्या होत्या त्यानुसार त्यांनी जवळपास २० वर्षापासून नाले सफाई केलेली नाही. ते करीत नसतील तर मनपाने साफ करावे व त्यांचेकडून खर्च वसुल करावा. आताच आपण सूचना केली की पाहणी करून अहवाल घेऊ. परंतु यापुर्वी शहा कन्सल्टन्सी व किर्लोस्कर या एजन्सीचा अहवाल आहे.

मा. सभापती : कार्यकारी अभियंता तसेच उप आयुक्त यांना सूचना करण्यात येते की, ज्या जगा लिजवर देण्यात आलेल्या आहेत त्यात ज्या अटी-शर्ती होत्या त्यांचा भंग कुणी करत असतील तर त्यांचेवर नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी. किती ठिकाणी जगा लिजवर देण्यात आलेल्या होत्या त्याचा संपूर्ण अहवाल पुढील बैठकीत देण्यात यावा. आता साफसफाईसंबंधी चर्चा करावी. गेल्या २५ तारखेला मी स्वत: एका वार्डमध्ये पाहणी केली. तेथे विभागीय अधिकारी सुध्दा हजर होते. तेथील साफसफाईच्या कामाची अत्यंत वाईट अवस्था आहे. त्यांना सूचना देऊनही काम झालेले नाही. मी पुन्हा तेथे जऊन पाहणी करून खात्री केलेली आहे. त्यांनी मजुरांची मागणी केलेली होती. एक फावडा पार्टी त्यांना देण्यात आलेली असतांना त्यांनी काम केलेले नाही. ते का केले नाही विभागीय अधिकारी यांनी खुलासा करावा, ते नसतील तर उप आयुक्त (प्र) यांनी खुलासा करावा. त्यांची रज आलेली आहे का? ते सुटीवर गेले असतील तर त्यांचा पदभार कुणाकडे आहे.

उप आयुक्त (प्र) : हर्सूल या गावात आठ दिवसांपुर्वी मा.सभापती यांनी भेट दिली. तेथील समस्यांची सर्व माहिती विभागीय अधिकारी यांना दिलेली होती. ते दूर करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याच्या सूचना सुध्दा देण्यात आलेल्या होत्या. विभागीय अधिकाऱ्यांची रज आतापर्यंत माझ्याकडे नाही. त्याचे कारण तपासून त्यांनी तेथील काम केले नसेल तर त्यांना सक्त ताकीद देऊन किंवा सभागृह जेनिर्देश देईल त्यानुसार निश्चित कार्यवाही प्रशासन करेल.

मा. सभापती : प्रशासनाच्या कामात सुसूत्रता यावी या दृष्टीने योग्य ती दखल घ्यावी. पुढील पाच दिवस मा.आयुक्त येथे नाहीत. उप आयुक्त यांनी विभागीय अधिकाऱ्यांची साफसफाईचे संदर्भात बैठक आयोजित करावी. साफसफाई बाबत कार्यवाही करावी लागणार आहे. कचरावाहू गाड्यांच्या ट्रीप (खेपा) वाढवाव्या लागणार आहेत. योग्य ते नियोजन करावे लागेल. उप आयुक्त (प्र) हे नियोजन करण्यास सक्षम आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य : इतर झोनच्या व लोकसंख्येच्या प्रमाणानुसार झोन क्र.४ मध्ये कर्मचारी वर्ग कमी आहे. तो वाढवून देण्यात यावा.

श्री.दिलीप गायकवाड : दोन-तीन वर्षापुर्वी जलन्याच्या एका ठेकेदाराला स्लम भागातील फोटोपास तयार करण्यासाठी ठेका दिला होता. ते काम त्यांनी केले नाही. खुलासा करण्यात यावा.

मा. सभापती : जवळपास तीन विभागावर चर्चा झालेली आहे. आता विद्युत विभागाची परिस्थिती समाधानकारक नसल्यामुळे विद्युत पथदिवे दुरूस्त करण्यासाठी माझ्या माहितीप्रमाणे चार वाहने आहेत. नियोजन करावे. कार्यकारी अभियंता यांनी दोन उप अभियंत्यांकडे वॉर्ड विभागून द्यावेत. त्यांची जबाबदारी निश्चित करावी. एका वार्डात एक दिवस संपूर्ण लाईट चालू आहेत कि बंद यासंबंधी खात्री करावी. सर्व्हे केला जवा. बंद असलेले लाईट चालू करण्यात यावेत. जी दुरावस्था आहे त्या बाबतीत नियोजन करावे. यासंबंधी सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभेत चर्चा झालेली आहे. खाजगी एजन्सीची आवश्यकता असेल तर तसा प्रस्ताव या सभागृहासमोर द्यावा. अतिक्रमणाचे बाबतीत जी चर्चा झाली त्यात हर्सूल तलाव व बाळकृष्णनगर भागात अतिक्रमण झाले त्याची नोंद घ्यावी. प्रशासकीय अधिकारी यांनी सतत फिरतीवर राहावे. विभागीय अधिकारी यांना बैठकीला आपण पाचारण करीत नाही. उप आयुक्त यांचे अंतर्गत तो विभाग आहे. या सभागृहात

स.सदस्यांनी अनेक वेगवेगळ्या विषयावर मत व्यक्त केलेले आहे. बदलीवर कुणी काम करीत असतील तर ती पध्दत बंद झाली पाहिजे आपसात कर्मचारी कामाला लावून दुर्दैवी अपघात झाला तर जबाबदार कोण. एखादा कर्मचारी काम करू शकत नसेल तर दुसरे कर्मचारी भरती करता येतील. असे कोणी काम करीत असेल व विभागीय अधिकारी त्यास सपोर्ट करीत असेल तर ते चुकीचे आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : या शहरात बरेच टायमर लावण्यात आलेले आहेत. दिवसा सर्व लाईट चालू असतात व रात्री बंद असतात. टायमरचा ठेका ज्यांच्याकडे दिला त्यांना मी भेटण्याचा प्रयत्न केला. परंतु ते उपलब्ध होत नाही. संबंधीत अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात.

श्री.गजनन बारवाल : मनपा व एमएसईबीचा समन्वय नाही. जेव्हा मनपाचे कर्मचारी साहित्य घेऊन काम करण्यास जतात तेव्हा एमएसईबीकडून सहकार्य मिळत नाही. तसेच मनपाच्या विद्युत विभागाने वार्डात भेट देऊन पाहणी करावयास पाहिजे नगर सेवकांच्या सूचना विचारात घेतल्या जव्यात. जे साहित्य विद्युत विभागात आहे ते अल्प प्रमाणात आहे. काही साहित्य तर उपलब्ध नाही. जेविद्युत दिवे बंद असतात त्याचे काम वेळेवर केले जत नाही. गाडी नाही म्हणून सांगतात. आताच्या परिस्थितीत लोडशेडींग होते आहे. तरीही कोणत्याच प्रकारचे काम करण्यात येत नाही. प्रशासकीय अधिकारी यांनी फिरतीवर असावे असे आपण सांगता परंतु जेथे मोठमोठे रस्ते आहेत त्या रस्त्यावर फळाच्या गाड्या व टपऱ्या उभ्या असतात. तसेच माठ विक्री करणारे बसलेले असतात. याकडे बघूनही लक्ष दिले जत नाही. तरी तशा सूचना आपण कराव्यात.

सौ. लता दलाल : अतिक्रमण विभागाने नियमानुसार कार्यवाही केली पाहिजे या विभागाचा लोकांवर वचक असावा. अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाचे विरोधात कार्यवाही केली पाहिजे मोठमोठ्या मंडळींनी रस्त्यावर अनधिकृत बांधकाम केलेले आहे. पार्कींगसाठी जगा सोडलेली नाही. वाहनेही सर्व रस्त्यावर उभी असतात. तसेच रस्ता रूंदीकरण केल्यानंतर गाड्या उभ्या असतात. गॅरेज सुरू आहेत. म्हणून जणाऱ्या येणाऱ्यांना जगा सुध्दा उपलब्ध होत नाही. अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. म्हणून हा विभाग सक्षम बनला पाहिजे सभागृहाची मदत आवश्यक असेल तर तीही मिळेल. हा विषय गांभीर्याने घ्यावा.

श्री. मुजीब खान : डी.पी. रोड तसेच ओपन स्पेसवर अतिक्रमण होत राहिले तर मनपाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होईल. आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ११२५३ ले-आऊट आहे त्याच बाजूला माझे रेखांकन आहे. परंतु माझ्या रेखांकनातील खुल्या जगेवर कोणतेही अतिक्रमण नाही. परंतु लगतच्या ले-आऊट खुल्या जगेलगत शादीखाना तयार केला. एका शादीचे ५०००/- घेतात. खुल्या जगेला संरक्षित भिंत तयार करण्यात आली. अनेकवेळा सभेत चर्चेला विषय आला परंतु कार्यवाही झालेली नाही. अतिक्रमण झालेले काढू शकत नाही तर अधिकारी करतात काय? मा.आयुक्तांना विनंती की, ११२५३ मध्ये ले-आऊटची खुली जगा आहे. त्यालगत शादीखाना झालेला आहे. एवढ्या मोठ्या खुल्या जगेचा फाया फक्त मोतीवाला फंक्शन हॉलला होतो.

श्री.अजिजजहागिरदार : क्रांतीचौक भागात मनपाची जगा आहे. श्री.बलदीया, भारत ॲटो, दोन, तीन सॉ मील इत्यादींना लीजवर जगा देण्यात आलेली होती. ५५ वर्षाचे लिजवर दिलेली

होती. ५५ वर्षाचा करारनामा संपून २० वर्षे होत आहेत. त्या जगेचे कागदपत्र नाही. करारनामा नाही. कोणतीही फाईल नाही व नोटीस देण्यात आलेली नाही. हे किती दिवस चालणार आहे. सर्व फाईल गायब आहे. ते स्वत: मालक झालेले आहेत. आज्ही रेकॉर्ड आहे की, ती मनपाची जगा आहे.

श्री. रेणुकादास वैद्य : लीज्वर दिलेल्या जगेची मुदत संपल्यानंतर मनपाच्या अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यांना ताबडतोब नोटीस देऊन जगा मनपाच्या ताब्यात घ्यावी. उस्मानपुराकडून उत्सव मंगल कार्यालयाकडे जणारा रस्ताही अत्यंत वर्दळीचा रस्ता आहे. त्या रस्त्यावर दोन्ही बाजूनी फळांच्या गाड्या लावलेल्या असतात. संबंधीत अधिकाऱ्यांना पत्र दिले, वारंवार भेट घेतली. परंतु कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

श्री.गजनन बारवाल : क्रांतीचौक येथे मनपाची जगा असतांना का ताब्यात घेत नाही. आज्ही त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे चालू आहेत. याबाबत गंभीर दखल घेऊन येणाऱ्या बैठकीत माहिती द्यावी.

श्री. मुजेब खान : आंब्यावर रासायनिक प्रक्रीया करून आंबे पिकविल्या जतात. त्याबद्दल या वर्षी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. मी स्वत: शहागंज, रोशनगेट भागात पाहिले. आंबे खाणाऱ्या व्यक्तींना उलट्या होत होत्या. आरोग्य विभागाने आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे. जनतेचा जीवन मरणाचा प्रश्न आहे, दुर्लक्ष करू नये.

मा. सभापती : मनपाच्या ले-आऊट व मनपाच्या मालकीच्या जगेसंबंधी स.सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. ज्या ले-आऊटच्या संदर्भात मत व्यक्त केले त्याबाबत संपूर्ण माहिती नगर रचना विभागाने द्यावी. ज्या जगा लिज्वर दिलेल्या आहेत त्याचे नुतनीकरण केलेले नाही किंवा तसा प्रस्ताव सभागृहापुढे आलेला नाही. या बाबतीत सर्व माहिती आगामी बैठकीत देण्यात यावी. अमुक कागद, संचिका मिळाली नाही म्हणून कारण ऐकून घेतले जणार नाही. आरोग्य विभागाने गेल्या वर्षात कार्यवाही केलेली होती. त्यामुळे थोडा फार वचक निर्माण झालेला होता. या विभागाचे अधिकारी यांनी शहरात भेटी देऊन पाहणी करावी. जे काही मदत अन्न व औषधी प्रशासन विभागाची पाहिजे असेल ती घ्यावी. जेथे आंबे पिकविण्याचा साठा असेल तेथे प्रशासनाला बरोबर घेऊन पाहणी करावी. त्या आंब्यावर रासायनिक प्रक्रीया करून आंबे पिकविले जत असतील, त्यामुळे नागरिकांना त्रास होत असेल तर संबंधीतावर त्वरीत कार्यवाही करावी.

श्री.गजनन बारवाल : जैविक कचऱ्या बद्दल वर्तमानपत्रात आले. अनेक हॉस्पीटलवर कार्यवाही करण्यात आलेली आहे. जैविक कचरा उचलण्याची जबाबदारी मनपाने घेतलेली आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळाने नोटीस पण दिलेली होती. कार्यवाही करण्यात आलेली आहे. परंतु आवश्यक तेवढी गंभीर दखल घेतली जत नाही. शहरात येणारे दुध हे निकृष्ट दर्जचे येते. या बाबत आरोग्य विभागाने गंभीर दखल घ्यावी तसेच ज्या ज्या हॉटेलमध्ये दूषित पाणी आहे त्याची तपासणी होणे आवश्यक आहे. ते दुषित असेल तर संबंधीत हॉटेल चालकांवर कार्यवाही करावी.

मा. सभापती : शहरात येणारे दुध, हॉटेल मधील पाणी त्याचे नमुने तसेच आंब्याचा साठा व इतर पदार्थांचे नमुने घेऊन तपासणी करण्यात यावी. पाहणी पथक जस्त वेळ कार्यान्वित करावे. जैविक कचऱ्याचा विषय निघाला, तो विषय मोठा आहे.

त्यासाठी विशेष बैठक घ्यावी लागणार आहे. जे काही वेळ चर्चेसाठी दिला होता तो संपलेला आहे. १५ मिनिटांसाठी ही बैठक तहकूब करण्यात येते.

(वेळ दुपारी १.२० वाजता. सभेला पुन्हा सुरूवात दुपारी २.०७ वाजता)

**विषय क्र.२ :**

दिनांक १७/५/२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा. सभापती : इतिवृत्त कायम करण्यात येत आहे.

**ठराव :**

दिनांक १७/५/२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

श्री.गजनन बारवाल : मा.सभापतींनी सभापती पदावर निवड झाल्यानंतर सभागृहात जेभाषण केले होते ते इतिवृत्तात आलेले आहे. केलेल्या भाषणाची भविष्यात नोंद घेवून काम करावे अशी विनंती आहे.

**विषय क्र.३ :**

उप आयुक्त(प्र) यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २००५-०६ (१-४-०५ ते ३१-३-०६) या एका वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील प्राण्यांकरीता बीफ (खन्नी) खरेदी करणे करीता निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ६ कोऱ्या निविदांची विक्री झाली असून त्यापैकी ३ भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.अब्दुल रहीम शेख छोटे | रू.२६.०० प्रति किलो |
| २. | श्री.फिरोजखान अ. रहेमानखान | रू.३२.०० प्रति किलो |
| ३. | श्री.अब्दुल हमीद शेख हनीफ | रू.३५.०० प्रति किलो |

तुलनात्मकृदृष्ट्या सर्वात कमी दर श्री.अब्दुल रहीम शेख छोटे यांचे रू.२६/- प्रति किलो असून संबंधीताशी झालेल्या चर्चेनंतर त्यांनी रू.२६/- प्र.कि. हे दर कमी करून रू.२१/- प्रति किलो या दराने पुरवठा करण्याची तयारी दर्शविली आहे. या दरास मान्यता व्हावी. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.कंवरसिंग बैनाडे : विषय क्र.३ संबंधी सर्वांनाच माहिती पाहिजे असे माझे मत आहे. किती प्राणी आहेत, दररोज किती बीफ खन्नी लागते, माहिती द्यावी. तसेच तीन निविदा आल्या. तिघांना वाटाघाटीसाठी प्रशासनाने बोलविलेले होते का?

श्री.गजनन बारवाल : मागच्या वेळेस कोणत्या दराने मंजूरी दिली होती, आज पर्यंत संबंधीतास किती रक्कम देण्यात आली आणि मुदत संपल्यानंतर बीफ खन्नी कोठून घेत आहोत याची माहिती देण्यात यावी. यात सर्वात कमी दर २६/- रूपये प्रतिकिलो असून वाटाघाटीनंतर २१/- रूपये दिले. मार्केटमध्ये ३५/- रूपये दर आहे. २१/- रूपयाप्रमाणे योग्य दर्जाचे बीफ पुरवठा होईल का याबद्दल शंका येते. माहिती देण्यात यावी. जेबीफ पुरवठा केला जतो तो कुणाच्या नियंत्रणाखाली आहे. त्याची तपासणी होणार आहे का?

श्री.अज्जिजगीरदार : सोने १० ग्रॅमची किंमत ५०००/- आहे. कोणी २५००/- ला देतो. मालाची खात्री करावी. कसोटी घेणे आवश्यक आहे.

संचालक(प्राणी संग्रहालय): सन २००५-०६ या वर्षासाठी टेंडर मागविण्यात आले होते. एकूण तीन टेंडर आलेले असून सर्वात कमी दराचे श्री.अब्दुल रहीम शेख छोटे यांचे होते. त्यांना मा.आयुक्तांनी वाटाघाटीसाठी बोलविले. त्यांनी २१/- रूपये प्रतिकिलो प्रमाणे

देण्याचे मान्य केले. त्यास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली व मा.स्थायी समिती समोर ठेवण्याचे निर्देश दिले. बाजरभाव ३५/- रूपये असेल परंतु टेंडरमध्ये बिलो येतातच. पडेगांव येथे कत्तलखान्यात जनावरे आणून शासनाचे पशुवैद्यकीय डॉक्टर यांनी प्रमाणीत केल्यानंतरच त्याची कत्तल केली जते. त्यानंतर मांसाचे तुकडे करून प्राणी संग्रहालयात मनपाच्या देखरेखी खाली आणले जते. प्राणी संग्रहालयात आणल्यानंतर त्याची पुन्हा तपासणी होते. दररोजचे २२२ किलो बीफ खन्नी लागते. पांढरे वाघ ११, सिंह ५, पँथर ७, तडस ६, कोल्हे ५, उद मांजर ४, मगर १ - एकूण २२२ किलो प्रति दिवस लागते. २१/- रूपये प्रमाणे १४,५७,०००/- खर्च येणार आहे. मागच्या वर्षी दर रूपये १६.९० पै. इतके होते. त्यानुसार ११,७३,०००/- रूपये खर्च आलेला होता. तीन वर्षापुर्वी ७/- रूपये दर होते.

श्री.कंवरसिंग बैनाडे : तीनही टेंडर धारकांना बोलावले का फक्त एकच टेंडरधारकास बोलावले.

संचालक (प्रा.सं.) : सर्वात कमी ज्याचे दर असतात त्यांनाच नियमाप्रमाणे वाटाघाटीसाठी बोलविता येते.

श्री.अजिजजहागिरदार : मंजूर करावे.

मा. सभापती : प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००५-०६ (१-४-०५ ते ३१-३-०६) या एका वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील प्राण्यांकरीता बीफ (खन्नी) खरेदी करणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.अब्दुल रहीम शेख छोटे यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार रू.२६/- प्र.कि. ऐवजी रू.२१/- प्रति किलो या दराने त्यांचे कडून बीफ(खन्नी) खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.४ :**

डॉ.सौ.ज्ञानदा कुलकर्णी, सांस्कृतिक अधिकारी यांनी त्यांचे निलंबन आदेश ज.क्र. मनपा/आस्था-१/२००५/८०३, दि.२०/५/२००५ विरूध्द केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**संवाद :**

श्री.अजिजजहागिरदार : यासोबत अपीलाची प्रत सादर करावयास पाहिजे होती. तसेच निलंबन आदेश देणे आवश्यक होते. अपीलाची प्रत व निलंबन आदेशाची प्रत जेडली नाही. अपीलामध्ये काय मुद्दे टाकण्यात आले ते वाचून येथे चर्चा करता आली असती. कोणत्या कलमाखाली निलंबीत केले, कोणत्या कलमाखाली त्यांनी अपील केलेले आहे. हे सर्व मुद्दे यासोबत नाही. म्हणून पुढील बैठकीत ते घेण्यात यावे.

श्री.मुजेब खान : नवीन पध्दत या मनपामध्ये सुरू होते आहे. जेव्हा मोठे अधिकारी निलंबीत होतात तेव्हा १, २ आठवड्यात तात्काळ अपील समोर येते. परंतु वर्ग-४ व वर्ग-३ चे कर्मचाऱ्यांचे अपील वर्षानुवर्षे या सभागृहासमोर येत नाही. म्हणून विनंती की, जेवढेही कर्मचारी, अधिकारी निलंबीत आहेत त्यांचे अपील एकत्रित घेण्यात यावे. सर्वांच्या बाबतीत एकत्रित निर्णय झाला पाहिजे एक एक ठराव येतो, यासोबत काहीही दिलेले नाही. म्हणून हा विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा. प्रशासनाने याची तपासणी करावी जेणे करून सभागृहात आम्हाला खुलासा मिळेल. मा.आयुक्तही नवीन आहेत. येणाऱ्या सभेत घ्यावे.

श्री.रेणुकादास वैद्य : अपील वाचून दाखविले तरी सर्व स.सदस्यांना माहिती होईल.

श्री.दिलीप गायकवाड : स.सदस्य श्री.मुजेब खान यांनी मांडलेली सूचना बरोबर आहे. अनेक वेळा वर्ग-३, वर्ग-४ चे निलंबीत कर्मचाऱ्यांनी अपील घेण्याची विनंती केलेली आहे. परंतु घेतलेले नाही. म्हणून एकत्रित बसून एक सभा त्यासाठी आयोजित्त करून काय निर्णय घ्यायचा तो घेण्यात यावा.

श्री.गजनन बारवाल : विषय क्र.४ वर चर्चा चालू असून हे एकच अपील आहे की, आणखी अपील आलेले आहेत.अपीलकर्ते येथे उपस्थित असतील तर त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात यावी.

श्री.अज्जिजहागिरदार : कोणत्या कायद्याखाली हे अपील आलेले आहे, त्यासाठी कायदा आहे का त्याची सविस्तर माहिती विधी सल्लागार यांचेकडून घेण्यात यावी. अपील करण्याचा अधिकार व सुनन्याचा अधिकार कोणत्या कलमाखाली आहे.

सौ.लता दलाल : जे अपील आलेले आहे ते वाचून दाखवावे व अपीलकर्त्यास त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी द्यावी.

मा. सभापती : अपील वाचून दाखविण्यात येणारच आहे. ज्यांना अपीलाची प्रत दिली नाही त्यांना आताच सभागृहात देण्याची व्यवस्था करीत आहे. तसेच वर्ग-३, वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे. आपणाला सर्वांना बरोबर घेऊन जयचे आहे. सर्वांना सारखाच न्याय मिळाला पाहिजे अधिकाऱ्यांना वेगळा व इतर कर्मचाऱ्यांना वेगळा असे होणार नाही. सर्वाना एकाच नियमात बसवून जे कार्यवाही करावयाची ती सर्वांच्या संमतीने करू या. स्थायी समिती समोर ज्यांनी अपील केलेले आहे ते समोर येतील. त्या सर्वच्या सर्व अपीलावर आपल्या सर्वांच्या सहमतीने निर्णय घेतला जईल. आपल्या अधिकारामध्ये निश्चितपणे सर्वांना समान न्याय दिला जईल.

श्री.मुजेब खान : खालच्या संवर्गातील कर्मचारी अपील करतात परंतु ते सभेत येत नाही. जे मोठा आहे त्याचेच घेणार काय? जे गरीब आहे त्याचे अपील सभागृहासमोर येत नाही.

सौ. लता दलाल : स.सदस्य जे बोलले त्याचा खुलासा व्हावा. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी ट्रेड युनियन लागू असल्यामुळे ते लेबर कोर्टात अपील करू शकतात.

श्री.मुजेब खान :पदाने लहान असतात त्यांना कोणला भेटून विनंती देखिल करता येत नाही. तेथपर्यंत जऊ शकत नाही.

मा. सभापती : कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांकडे किंवा पदाधिकाऱ्यांकडे भेटण्याची आवश्यकता नाही. कायद्यात तरतुद आहे त्या त्या कर्मचाऱ्यांनी सभापतींकडे अपील करणे आवश्यक आहे. त्याची सुनावणी या सभागृहात होणार आहे. अधिकाऱ्यांसमोर जयचे नाही. कोणी कुणाच्या दबावाखाली येण्याचे कारण नाही. पहिल्या सभापतींनी काय केले हे मी सांगू शकत नाही. मला कामकाजकसे करावयाचे हे आपल्या संमतीने ठरवू या. या सभागृहाला सर्व अधिकार आहे. ट्रेड युनियन लागू असो किंवा नसो. त्या त्या कर्मचाऱ्यांनी नियमाप्रमाणे अपील करावयास पाहिजे जे सुनावणी होणार आहे ती आपल्या सर्वांच्या समोर होईल. विधी सल्लागाराचे मत जेंव्हा अडचण येईल तेव्हाच घेतले जईल.

श्री.गजनन बारवाल : आज बघितले तर सर्व ठिकाणी यास मोठी प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. एकीकडे आपण सांगतो की, प्रसिध्दीचे माध्यम हे सर्वांसाठी लागू आहे. सर्वांनी प्रसिध्दीकडे जवे, आपल्या बातम्या द्याव्यात. काल पदभार स्विकारणारे आयुक्त

पदभार देणारे आयुक्त यांनी पदभार दिल्यानंतर मा.महापौर, मा.सभापती बोलले. मनपामध्ये स्थायी समिती अस्तित्वात आहे. त्यांना विशेष असे सर्व अधिकार आहेत. असे असतांना सुध्दा बाहेर काही स्टेटमेंट दिलेले आहेत.

मा. सभापती : सभापती म्हणून माझे कोणत्याही वृत्तपत्रात स्टेटमेंट नाही.

श्री.गजनन बारवाल : मी आपणांस सांगू इच्छितो की, काल अपीलच्या बाबतीत सुध्दा चर्चा करण्यात आली. आपल्याकडे अपील आले याची माहिती सुध्दा सभागृहाला आली. काल सुध्दा मा.आयुक्त व मा.महापौर यांनी प्रेसला माहिती दिली त्यावर सुध्दा आम्हाला चर्चा करायची आहे.

मा. सभापती : तो मुद्दा निश्चित समोर आल्याच्या नंतर माहिती घेता येईल. माहिती मागविण्याचा अधिकार आपणा सर्वांचा आहे.

श्री.गजनन बारवाल : प्रेसमध्ये आलेले आहे, अपील आले नसते तरी चर्चा करणे आवश्यक होते. मोठ्या पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही होते. प्रेसला माहिती दिली जते. त्यावर आपणाला चर्चा करणे आवश्यक आहे.

श्री.अजिज़जहागिरदार : एकीकडे मा.महापौर म्हणतात मनपाच्या तिजेरीत खडखडाट आहे तर दुसरीकडे मुख्य लेखाधिकारी श्री.खैरनार सांगतात की शासनाकडून अमुक अमूक पैसे यायचे आहे. १० कोटीचा ड्राफ्ट रूटींनमध्ये तोडलेला आहे. हे बोलण्याचा अधिकार त्यांना कोणी दिला. एक तर मा.महापौरांनी सांगावे नसता मा.आयुक्तांनी सांगावे. सरकारकडून इतके पैसे यायचे हे बालण्याचा अधिकार श्री.खैरनार यांना कोणी दिला, हे कितपत खरे आहे. जेपर्यंत शिस्त येत नाही तोपर्यंत असे कारभार चालणार नाही. माझे मत असे आहे की, अगोदर शिस्त पाळावी, अधिकाऱ्यांमध्ये शिस्त नावाचे काहीच राहिलेले नाही. कोणीही यायचे प्रेस कॉन्फरन्स घ्यायचे हे चालणार नाही. जेअपील आलेले आहे त्यात दोन ओळी नमूद केलेल्या आहे. जवक क्रमांक, आवक क्रमांक या अपीलाच्या संदर्भाने मा.आयुक्तांनी त्यांना निलंबीत केले तो त्यांचा अधिकार होता किंवा नाही. आदेशाची प्रत नाही, अपीलाची प्रत नाही. चर्चा काय करणार आहे. वाचून दाखवून चालणार नाही. एक एक शब्दावर आम्हाला विचार करावा लागेल. नेमके काय लिहिलेले आहे. कोणत्या सेक्शन खाली केलेले आहे.

मा. सभापती : स.सदस्यांनी जे शिस्तीबाबत मुद्दा उपस्थित केला त्याबद्दल दुमत नाही. दुसरा मुद्दा उपस्थित केला की, मा.महापौर म्हणतात तिजेरीत खडखडाट आहे. डिपाजेट तोडले मनपामध्ये पैसा आणण्याचे जे साधन आहे व मनपा चालविण्यासाठील आपली बॉडी सक्षम आहे. पैसे उपलब्ध करण्याच्या दृष्टीकोनातून मालमत्ता कर असेल, जक्कात कर असेल, वेगवेगळी अनुदाने असतील, राज्य शासनाचे, केंद्र शासनाचे अनुदान असेल ते सर्व उपलब्ध करून घेण्यासाठी आपण सक्षम आहोत. कोणी स्टेटमेंट केले म्हणून या सभागृहाचा त्यावर वेळ वाया जता कामा नये. हे बरोबर होणार नाही. आपल्या माहितीनुसार जे काही बेशिस्त चालले असेल, शिस्त लावण्याच्या दृष्टीने चर्चा करू शकता. मनपा हद्दीतील प्रत्येक नागरिकांना सुविधा देण्यासाठी जेजेचांगले करावे लागत असेल ते ते करण्यासाठी आपण सक्षम आहोत. विषयांतर न करता चांगले कामकाज चालण्याच्या दृष्टीकोनातून चर्चा व्हावी. मी कुठेही सभापती, नगरसेवक म्हणून प्रतिक्रिया

दिलेली नाही. मला माझे अधिकार माहित आहेत. विषयांतर न करता जे अपील आपल्यासमोर आहे त्यावर चर्चा करावी.

श्री.मुजीब खान : आम्हाला शहराच्या विकासाच्या कामाबाबत चर्चा करायची आहे.

श्री.कंवरसिंग बैनाडे : ऐनवेळी जे विषय येतात ते कधीच घेण्यात येऊ नये. अपील आलेले आहे. ऐनवेळी देत असेल ते घेवू नये. मी त्याचा निषेध करतो. हे सर्व स्थगित करून दुसरी चर्चा करावी. पुढील बैठकीत घेण्यात यावे.

श्री.अज्जिजहागिरदार : मी सुध्दा निषेध करतो.

सौ.लता दलाल : हा विषय, विषयपत्रिकेवर आलेला आहे. या अपीलाच्या प्रती सर्वांकडे दिलेल्या आहेत. जे अपील विषयपत्रिकेवर आहे ते घेण्यात यावे. अपील वाचून दाखविण्यात यावे. अपीलकर्त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी द्यावी.

श्री.कंवरसिंग बैनाडे : जी विषयपत्रिका सदस्यांना पोहचविली त्यामध्ये अपीलाची प्रत असेल तर मी हे सभागृह सोडून जईल. आता येथे अपीलाची प्रत देण्यात आलेली आहे. वाचता येते म्हणून या सभागृहात बसतो. आवक जवक क्रमांक दिला फक्त. विषय क्र.४ नुसते आलेले आहे. ऐनवेळी वाटप करण्यात आलेले आहे, असे चालणार नाही. माझे मत असे की, मा.महापौर, मा.सभापती मा.आयुक्त व इतर पदाधिकारी यांची एक बैठक बोलवावी व सर्व कर्मचाऱ्यांच्या अपीलावर निर्णय घेण्यात यावा. वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचारी यांना सुध्दा कामावर घ्यावे. त्यांना सुध्दा न्याय द्यावा. त्यांना त्यांचे म्हणणे मांडू द्यावे. जे गरीब आहे ते दोन दोन वर्षापासून सेवेत नाही. मोठ्या माणसांची कामे एक-दोन दिवसात होतात. ज्यांचे कोणी नाही त्यांचे काम करावे. याची नोंद घ्यावी.

श्री.अज्जिजहागिरदार : अपील जे लेखी स्वरूपात असेल आम्हाला प्रत दिलेली नाही. काय चर्चा करणार आहे. निलंबन तोंडी केलेले आहे का? अपील अपूर्ण आहे.

सौ.लता दलाल : विषय पत्रिकेवर विषय आहे त्यावर चर्चा करावी लागेल.

श्री.अज्जिजहागिरदार : अपूर्ण माहिती दिलेली आहे. त्यावर आम्हाला अभ्यास करावा लागेल.

श्री.दिलीप गायकवाड : मा.आयुक्तांनी नियमानुसार निलंबीत केलेले आहे.

सौ. लता दलाल : अपील वाचून दाखवावे. विषय पत्रिकेवर विषय आहे. चर्चा झाली पाहिजे

श्री.अज्जिजहागिरदार : अपीलामध्ये काय लिहिलेले आहे त्यावर आम्हाला अभ्यास करायचा आहे.

श्री.गजनन बारवाल : स.सदस्यांच्या भावना अशा झाल्या आहेत की, काहीतरी चुक आहे. परंतु चुक जरी झाली असेल तरी आपले सभागृह निर्णय घेण्यास सक्षम आहे. ज्यांना ज्यांना निलंबीत केले त्यांनी या मनपाची २०-२० वर्षे चांगली सेवा केलेली आहे हे सुध्दा विसरता येणार नाही. त्यांचे सेवेचा विचार करता त्यांचे भावनेचा विचार करता त्यांना नैसर्गिक न्याय देण्याच्या दृष्टीने दखल घ्यावयास पाहिजे त्यांना या सभागृहात बोलण्याची संधी देण्यात यावी. अपील आले नाही ही बाब सत्य आहे. योग्य प्रकारे दिल्या गेले नाही ही बाब सुध्दा सत्य आहे. तरीही विनंती की, त्यांना नैसर्गिक न्याय देण्यात यावा. त्यांना बाजूमांडण्याची संधी द्यावी.

श्री.साहेबराव कावडे : एका महिला अधिकाऱ्याचा विषय समोर आलेला आहे त्यावर विचार व्हावा. त्या अधिकाऱ्यांनी किती चांगले काम केलेले असेल. अधिकारी-कर्मचारी व या सभागृहाचे स.सदस्य ही महापालिकेची दोन चाके आहेत. ती बरोबर चालली तर मनपाचा विकास होऊ शकतो. त्यांची काही चूक झाली असेल किंवा

आयुक्तांबद्दल बोलले गेले असेल त्यावर स्थायी समिती सभापती यांनी विचार करून योग्य तो मार्ग काढावा. हे अपील निकाली काढावेत.

श्री.कंवरसिंग बैनाडे : अधिकाऱ्यांना किंवा कोणत्याही महिलेला विरोध नाही. हा विषय अपुरा विषय आहे. पूर्ण विषय आलेला नाही. म्हणून स्थगित ठेवावा. पुढील बैठकीत घेण्यात यावा.

मा. सभापती : स.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन ज्या काही त्रुटी विषय पत्रिकेसंबंधी असल्याचे भावना व्यक्त केल्या. जेव्हा कोणतेही अपील येते तेव्हा ते अपील विषयपत्रिकेसोबत देण्याची सचिव विभागाने दखल घ्यावी. जे अपील आलेले असतील ते विषयपत्रिकेसोबत यापुढे देण्यात यावे अशी सूचना करतो. स.सदस्यांच्या भावनांची नोंद घेण्यात आलेली आहे. यापुढे विषयपत्रिकेसोबत अपील देण्यात येईल. येथे अनुभवी सदस्य आहेत. कायद्याची त्यांना माहिती आहे, नियमाची माहिती आहे. म्हणून अपीलाच्या बाबतीत अपीलकर्त्या उपस्थित असतील तर त्यांचे जेकाही मत आहे ते मांडतील.

श्री.अजिजजहागिरदार : कोणत्या कायद्याखाली त्यांना बोलविणार आहोत, खुलासा करावा. कायदा दाखवा. विधी सल्लागार यांचे मत घ्यावे.

श्री.गजनन बारवाल : अपील केल्यानंतर त्यांचे मत मांडण्यासाठी मा.सभापती संधी देऊ शकतात. सभापतींचा तो अधिकार आहे.

मा. सभापती : स.सदस्यांनी नियमाच्या बाबतीत मत व्यक्त केलेले आहे. कर्मचाऱ्यांवर /अधिकाऱ्यांवर शेवटी कोणी अन्याय करीत असेल तर तो कोणताही कर्मचारी, अधिकारी असेल त्यांचेवर खरोखर अन्याय झाला असेल तर हे सभागृह न्याय देण्यास सक्षम आहे व सर्वांना ऐकून घेण्यासाठी, त्यांना त्यांचे मत मांडण्याची संधी देत आहोत. तसे अपील घेण्याचा, फेटाळण्याचा अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीप्रमाणे आहे. हे अपील मंजूर करावयाचे झाल्यास आपल्या सर्वांच्या संमतीने करता येणार आहे.

श्री.गजनन बारवाल : अपीलकर्ता येथे नाही. ही कार्यवाही प्रशासनातर्फे करण्यात आलेली आहे. केलेली कार्यवाही योग्य की अयोग्य आहे. माहिती देण्यात यावी.

मा. सभापती : प्रशासनाचे मत घेण्याचे स.सदस्यांनी म्हटले आहे. त्यावेळचे जे आयुक्त होते त्यांना योग्य वाटले त्यांनी तो निर्णय घेतलेला आहे. आता जे निर्णय घ्यायचा तो नवीन आयुक्त यांचा आहे.

श्री.गजनन बारवाल : कोणत्या नियमानुसार निलंबीत केलेले आहे. प्रशासन माहिती देऊ शकते.

श्री.रेणुकादास वैद्य : पाच अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात आलेली होती. दोन अधिकाऱ्यांचा खुलासा प्रशासनाने स्विकारलेला आहे. तीन अधिकाऱ्यांचा स्विकारलेला नाही. याचे कारण काय? प्रशासन का समाधानी होऊ शकले नाही याचा खुलासा करणयात यावा.

श्री.कंवरसिंग बैनाडे : प्रशासनाकडे सुध्दा त्याची माहिती नसावी. १० मिनिटे सभागृहाचा वेळ वाया जत आहे.

मा. सभापती : उप आयुक्त (प्र) यांनी सविस्तर खुलासा करावा की किती अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना नोटीस वगैरे दिलेल्या होत्या.

उप आयुक्त (प्र) : मागील काही दिवसात प्रशासनाने केलेली कार्यवाही पुढील प्रमाणे आहे. पाच दुय्यम आवेक्षक व चार कनिष्ठ अभियंते यांनी बनावट गुणपत्रिका सादर करून

मनपा प्रशासनाची दिशाभूल केल्या प्रकरणी त्यांचे विरूध्द सिटीचौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कर्मचाऱ्यांवर फौज्दारी स्वरूपाची कार्यवाही झालेली असल्यामुळे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ शिस्त व अपील नियम ४(१) (अ) नुसार त्यांचे विरूध्द प्रशासनाने विभागीय चौकशी प्रस्तावित करावयाची असल्यामुळे सदर ९ कर्मचाऱ्यांना दिनांक १८.५.२००५ रोजी निलंबीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर प्रशासनाने पुढील केलेली कार्यवाही, उप आयुक्त (म) यांचे स्वीय सहाय्यक श्री.बाहेती यांनी टपालावरील माहिती उप वृत्तपत्रांना पुरविली त्याबद्दल त्यांना एक कारणे दाखवा नोटीस बजवण्यात आलेली होती. त्यांचा खुलासा समाधानकारक न वाटल्यामुळे मा.आयुक्त यांनी दि.२६.५.२००५ रोजी त्यांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ शिस्त व अपील नियम १० नुसार रोखण्यात आली. सहाय्यक आयुक्त श्री.टी.जी.जधव यांना सुध्दा कारणे दाखवा नोटीस बजवण्यात आली होती. सहाय्यक आयुक्त-२ हे पद रिक्त असल्यामुळे या पदाचा कार्यभार टी.जी.जधव यांचेकडे होता. दोन्ही पदाचा कार्यभार एकाच व्यक्तीकडे ठेवणे यामुळे भार जस्त होईल म्हणून सहाय्यक आयुक्त-२ या पदाचा कार्यभार श्री.डी.बी.लोखंडे, कामगार अधिकारी यांचेकडे देण्याचे प्रस्तावित केलेले होते. तसा आदेशही मा.आयुक्त यांनी पारीत केलेला होता. सदर आदेश देण्यास श्री.टी.जी.जधव यांनी जणीवपूर्वक विलंब केल्यामुळे त्यांना प्रशासनाने कारणे दाखवा नोटीस बजवलेली होती. सदर नोटीसचा त्यांचा खुलासा समाधानकारक न वाटल्याने प्रशासनाने त्यांचे विरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियम शिस्त व अपीलचे नियम ८ नुसार विभागीय चौकशी प्रस्तावित केलेली आहे. श्री.के.के.माळे हे विभाग क्र.६ मध्ये दुय्यम आवेक्षक म्हणून पाणी पुरवठा विभागामध्ये काम करतात. तेथील विभागीय अधिकारी यांनी त्यांना काम व्यवस्थित करण्याविषयी वेहोवेळी सूचना दिलेल्या होत्या. तसेच दैनंदिन कामकाजते करत नसल्यासंबंधी सुध्दा प्रशासनास पुरावे प्राप्त झालेले होते. त्याविषयी त्यांना कारणे दाखवा नोटीस बजवली होती. सदर नोटीस घेण्यास सुध्दा त्यांनी नकार दिला ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यानंतर पुन्हा त्यांना एक नोटीस उप आयुक्त (प्र.) यांचेतर्फे देण्यात आलेली आहे. त्या नोटीसचा खुलासा सुध्दा त्यांनी समाधानकारक दिला नाही. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने त्यांना सुध्दा निलंबीत केलेले आहे. दि.३०/५/२००५ रोजी प्रशासनाने महापालिकेचे मुख्य लेखाधिकारी श्री.एम.पी.खैरनार यांना मुख्य लेखा परीक्षक हे पद रिक्त असल्यामुळे आणि या रिक्त पदावरून मागील काही दिवसांपासून उलट सुलट बातम्या प्रसिध्द होत आहेत. त्या बातम्याच्या केंद्रस्थानी हे पद असून ह्या बातम्या पुरविण्यामागे त्यांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहीाग आहे अशी प्रशासनाची धारणा झालेली असल्यामुळे त्यांना दि.३०/५/२००५ रोजी मनपा सेवेमधून निलंबीत करण्यात आलेले आहे. ज्या ज्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारणे दाखवा नोटीस बजवण्यात आलेल्या होतया त्यांचेवर कार्यवाही करण्यात आलेली आहे. श्री.एम.पी.खैरनार यांना कारणे दाखवा नोटीस बजवण्याशिवाय निलंबीत करण्यात आलेले आहे. जे कार्यवाही केलेली आहे ती योग्य आहे असे प्रशासनाचे मत आहे.

श्री.गजनन बारवाल : आताच उप आयुक्त (प्र) यांनी त्यांचा अहवाल सादर केलेला आहे. योग्य प्रकारचा नैसर्गिक न्याय देण्यात आलेला नाही. ज्या ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात आली, प्रशासकीय बाब असेल परंतु काम करतांना सर्वांना निश्चितपणे नैसर्गिक न्याय द्यावयास पाहिजे होता. यात श्री.खैरनार यांनाच पूर्वसूचना न देताच निलंबीत करण्यात आले ही जी कार्यवाही आहे ती अयोग्य आहे असे मला वाटते.

श्री.रेणुकादास वैद्य : आताच खुलासा करण्यात आला त्यात असे म्हटले आम्हाला असे वाटले, प्रशासनाची अशी धारणा झाली, परंतु प्रशासनाकडे ठोस पुरावे नसतांना अशी गंभीर स्वरूपाची कार्यवाही करणे कितपत योग्य आहे. प्रशासनाची झालेली धारणा ही चुकीची आहे. ठोस पुरावा नाही, सबळ कारण नाही. फक्त प्रशासनाला वाटते त्यांनी कार्यवाही केली. अशी विनंती आहे की ज्यांचेवर अन्याय झालेला आहे त्यांनी आपणाकडे न्याय मागितलेला आहे. त्यांना न्याय देण्यासाठी आपण प्रयत्न करावे. तशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना कराव्यात.

सौ. लता दलाल : ज्या ज्या कर्मचारी, अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात आली त्यांनी असे काय गुन्हे केले आहेत. ते अमुक पत्रकाराकडे गेलेले होते याचा काही पुरावा प्रशासनाकडे आहे का? तत्पुर्वी प्रशासनाने काही विभागीय चौकशी केलेली होती का? चौकशीचा निष्कर्ष आल्यानंतर व पुरावे सापडल्यानंतर त्यांचेवर ही कार्यवाही करण्यात आलेली आहे का? प्रशासनाने खुलासा केला त्यात असे म्हटले असे वाटते, अशी धारणा झाली. हे शब्द प्रशासकीय कामात योग्य वाटत नाही. प्रशासन जसे नियमाने चालते त्याप्रमाणेच प्रशासनाकडून आम्हाला नियम दाखवूनच उत्तर मिळावे अन्यथा हा त्यांचेवर झालेला अन्याय आहे आणि या एकतर्फी अन्याया विरूध्द त्यांनी न्याय मागितलेला आहे. निश्चितच त्यांचेवर अन्याय झाला हे सिध्द होते.

श्री.गजनन बारवाल : अधिकाऱ्यांनी खुलासा केला परंतु या बाबतीत प्रशासनाचे काय मत आहे. श्री.खैरनार यांनी त्यांचे अपीलामध्ये खुलासा केलेला आहे.

सौ. लता दलाल : अपीलकर्ता यांना त्यांचे मत मांडण्याची संधी द्यावी.

श्री.कंवरसिंग बैनाडे : स्थगित ठेवावे.

श्री.अज्जिजहागिरदार : आम्हाला कोणाबद्दल बोलायचे नाही. स्थगित ठेवावे.

श्री.दिलीप गायकवाड : अर्धवट विषय आहे, मंजूर करू नये.

श्री.साहेबराव कावडे : विषय क्र.४ वर बोलावे. दुसरा विषय घेऊ नये. वेगवेगळ्या कर्मचाऱ्यांचे वेगवेगळे विषय आहेत.

श्री.गजनन बारवाल : सौ.ज्ञानदा कुलकर्णी यांना त्यांचे मत मांडण्यासाठी बोलविण्यात यावे.

श्री.दिलीप गायकवाड : अर्धवट विषय मंजूर करू नये.

श्री.गजनन बारवाल : विषय क्र.४ बहुमताने मंजूर करावा.

मा. सभापती : स.सदस्यांच्या भावना अशा आहेत की, त्यामध्ये विषय पत्रिकेवर विषय येत असतांना ज्यांचे अपील स्थायी समिती समोर येतील ते अपील सर्व स.सदस्यांना विषयपत्रिकेसोबत यापुढे देण्यात यावे. याच अनुषंगाने ज्यांचेवर अन्याय झाला असेल असे जे जे कर्मचारी असतील त्यांचे सर्व अपील आपल्यासमोर येतील ते सर्व अपील आपल्यासमोर ठेवण्यात येतील. सर्वांना समान न्याय देण्यात येईल. विषय क्र.४ हा स.सदस्यांच्या भावना विचारात घेऊन व जे काही खुलासा येथे

प्राप्त झालेला आहे, त्यांचा संपूर्ण सेवेचा कार्यकाळ पाहता एकंदरीत त्यांचे कामाकाजचा अनुभव पाहता विषय क्र.४ हा सर्वांच्या संमतीने मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

डॉ.सौ.ज्ञानदा कुलकर्णी, सांस्कृतिक कार्य अधिकारी यांनी सादर केलेल्या अपिलास मंजुरी देण्यात येऊन त्यांचे निलंबन आदेश ज.क्र./मनपा/अस्था-१/२००५/८०३, दिनांक २०/५/२००५ रद्द करण्यात येतात. त्यांना त्वरीत कामावर रूजूकरून घेण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.अज्जिज्हागिरदार : विषय मंजूर करा परंतु त्यांनी माफीनामा लिहून दिला पाहिजे

सौ.लता दलाल : चुकच केली नाही तर माफीनामा लिहून देण्याची आवश्यकता काय?

श्री.अज्जिज्हागिरदार : चुकच केली नाही तर वृत्तपत्रात आले कसे. अपील कशासाठी करण्यात आले. त्यांनी प्रशासनाकडे माफीनामा लिहून दिला पाहिजे

**विषय क्र. ५ :**

श्री.एच.आर.बाहेती, उप आयुक्तांचे स्वीय सहाय्यक, मनपा औरंगाबाद यांनी त्यांची वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी थांबविण्या संबंधीच्या कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मआ/स्वीस/२००५/२११, दिनांक २६/५/२००५ रद्द करून थांबविण्यात आलेली वार्षिक वेतनवाढ पुर्ववत चालू करण्याबाबत सादर केलेल्या अपीलावर विचारविनिमय करून निर्णय घेणे.

**संवाद :**

मा. सभापती : यानंतर ऐनवेळी विषय घेतले जणार नाहीत. जे जे विषय निकडीचे असतील, प्रशासनाच्या दृष्टीकोनातून महत्वाचे असतील ते घेतले जतील. श्री. एच.आर.बाहेती, उप आयुक्त (म) यांचे स्वीय सहाय्यक यांचे अपील आहे. तेही मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

श्री. एच. आर. बाहेती, उप आयुक्तांचे स्वीय सहाय्यक, मनपा औरंगाबाद यांनी सादर केलेले अपील मंजूर करण्यात येते. त्यांची वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी थांबविण्या संबंधीचे कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मआ/स्वीस/२००५/२११, दिनांक २६/५/२००५ रद्द करून थांबविण्यात आलेली वार्षिक वेतनवाढ पुर्ववत चालू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.दिलीप गायकवाड : सभापती साहेब आपणच म्हणता ऐनवेळी विषय घेणार नाही. पुन्हा एक अपील घेतले. या सभागृहाचा निषेध करून मी बाहेर जत आहे.

(यावेळी स.सदस्य श्री.दिलीप गायकवाड हे विषयपत्रिका फाडून टाकतात व सभागृहाबाहेर निघून जतात.)

मा. सभापती : अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात ही सभा संपन्न होत आहे. ज्या ज्या सूचना स.सदस्यांनी केलेल्या आहेत त्यांची नोंद घेण्यात यावी.

यानंतर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद